# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर शहरात जलवाहिनी नसलेल्या भागात नागरीकांना टँकर्सद्वारे
**{सार्व.आ.अभि. विभाग}** पाणीपुरवठा करणे करीताचे कामाकरीता रु. 2,27,19,574/- चे प्राकलन तयार करण्यात आलेले आहे. सदर प्राकलनास तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेली असुन या कामास पद क्र. A43801940701 मधुन प्रावधान देण्यात आलेले आहे. सदर काम जलवाहिनी नसलेल्या भागात नागरीकांना पाणीपुरवठा करणेकरीता आहे.

करीता उपरोक्त कामास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच या कामाकरीता Request for Proposal / निविदा मागविण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :- 1) सदर काम पद क्र. A43801940701अंर्तगत प्रस्तावित आहे

2) सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 977 **/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 13 / 08 /2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (जलप्रदाय), सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर शहरात जलवाहिनी नसलेल्या भागात नागरीकांना टँकर्सद्वारे पाणीपुरवठा करणे करीताचे कामाकरीता रु. 2,27,19,574/- चे प्राकलन तयार करण्यात आलेले आहे. सदर प्राकलनास तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेली असुन या कामास पद क्र. A43801940701 मधुन प्रावधान देण्यात आलेले आहे. सदर काम जलवाहिनी नसलेल्या भागात नागरीकांना पाणीपुरवठा करणेकरीता आहे.

करीता उपरोक्त कामास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच या कामाकरीता Request for Proposal / निविदा मागविण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.